Pune Police

सत्यमेव जयते

वार्ता टिपण दि.०१/०८/२०१७

**पिंपरी चिंचवड शहरातील वाहन चोरी करणा-या सराईत चोरटयांना गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड,दक्षिण विभागाने केले जेरबंद**

पुणे शहर गुन्हेशाखे कडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागा मध्ये कार्यरत असणारे पोनिरी राम राजमाने व त्यांचा स्टाफ हे दि.३१/०७/२०१७ रोजी असे कोथरुड-वारजे माळवाडी पोलीस पो.ठाणेचे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलींग फिरत असताना पो.कॉ. ८४६ चौधर यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, तीन इसम एका चोरीच्या युनीकॉन मोटार सायकलवरुन कात्रजचे दिशेने सदरचे वाहन विक्री करता घेवुन चालले आहे, बातमीप्रमाणे पोलीस पथकातील कर्मचारी असे चांदणी चौक याठिकाणी सापळा लावुन वरील वर्णनाची दुचाकी व आरोपी यावर पाळत ठेवली असता मुबंई-बॅगलोर हायवेरोड चांदणी चौक,पुणे येथे मुबंईचे दिशेने एका होंडा युनीकॉन मोटार सायकलवरुन ट्रिपल सिट बसुन कात्रजचे दिशेने भरधाव वेगाने जाताना दिसल्याने त्यांचेबाबत संशय आल्याने त्यांना थांबण्याचा प्रयत्न केला परंतु ते न थांबता कात्रजचे दिशेने पळुन जावु लागल्याने त्यांना पाठलाग पकडुन त्यांचेजवळ असलेले मो.साय.नं.मो.साय.न.एम.एच.१४/ईएल/२८८६ हिचे मालकी,कागदपत्राबाबत विचारपुस करता त्यांचेकडे गाडीची कागदपत्र नसल्याचे व गाडीचे मालकीबाबत काहिएक खात्रीशिर माहिती न सांगितल्याने सदरची गाडी हि चोरीची असल्याचा संशय बळावल्याने सदर गाडीबाबत खात्रीकरता चिंचवड पोस्टे येथे गु.र.न.१८६/२०१७ भादविक ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाल्याने आरोपी नामे १) पवन सोनाजी इंगळे वय २५ वर्षे रा.सध्या- भोंडवेकॉर्नर, गवळी यांची खोली, पेट्रोल पंपजवळ, वाल्हेकरवाडी,चिंचवड,पुणे मुळगाव- मु.कोयाळी ता.रिसोड जि.वाशिम २) मोहन भिकाजी कांबळे वय २४ रा.सदर ३) नेताजी नारायण घोडके वय ३५वर्षे रा.भोंडवेनगर, भोंडवेकॉर्नर, गवळी यांची खोली, पेट्रोल पंपजवळ,वाल्हेकरवाडी,,पुणे मुळगाव- गुंडोपंथ दबका ता मुखेड जि.नांदेड त्यानां दाखल गुन्हयात अटक करुन त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी वाल्हेकरवाडी येथुन एकुण ८ मोटार सायकली चोरल्याचे निष्पण्ण झालेने त्यांचे अधिक सखोल तपास करुन त्यांचे ताबेतुन **एकुण ८ मोटार सायकली कि.रु.२,०५०००/-च्या जप्त करण्यात आल्या आहेत.**

सदरची कामगिरी गुन्हेशाखा,पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री.पंकज डहाणे सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.सुरेश भोसले सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने,पो.उप.निरी.श्री.उत्तम बुदगुडे सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान, रविंद्र कदम, पो.हवा.भालचंद्र बोरकर,सुनिल चिखले, गणेश साळुकें,संजय बरकडे, अजय उत्तेकर पो.कॉ.कैलास साळुके,रमेश चौधर,राकेश खुणवे,प्रविण पडवळ,विवेक जाधव,नितीन सवळ व चालक गंगावणे यांनी केली आहे.




क्राईम ब्रँच
(गुंडाविरोधी पथक – दक्षिण विभाग)
पुणे शहर
ॲन्टी ऑर्गनाईज्ड क्राईम सेल साऊथ रिजन [AOCC]
फोन नं. ०२० २६२०८२९५ / २६२०८२९५